# ‘ जेमॉलॉजी आणि ज्वेलरी’ मध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे विक्रांत सरफरे

विक्रांत सरफरे यांचे शिक्षण विचारात घेतले तर त्यांनी जेमॉलॉजी आणि ज्वेलरी या व्यवसायात करियर केलंय यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. त्यांनी बी.कॉम नंतर त्यांनी एम. बी. ए.(मार्केटिंग आणि एच.आर) केले. चांगल्या कंपनीत नोकरी करायची सोडून त्यांनी जेमॉलॉजी आणि ज्वेलरी हा व्यवसाय अंगीकारला, याला कारण त्यांची या क्षेत्राविषयीची असणारी आवड! या आवडीमुळे त्यांना घरच्यांचा रोषही पत्करावा लागला. उमेदीच्या काळात एका कन्स्ट्रक्शन कंपनीत काम करता करता घरूनच  ते अर्धवेळ जेमॉलॉजीचे काम करीत. हात पाहून लोकांना रत्ने सूचवित व ती डिझाईनही करून देत. याविषयी असणाऱ्या ज्ञानाचा अनुभव लोकांना लवकरच आला व त्यांच्याकडे यासाठी गर्दी होऊ लागली, परंतु ते हात पाहून भविष्य सांगत नाहीत. फक्त आयुष्यातली चांगली चिन्हे व घ्यावयाची काळजी याविषयीच ते अचूकपणे बोलतात. त्यांची ही आवड त्यांचा व्यवसाय झाला. मिटकॉनमध्ये त्यांनी या आवडीमुळे ज्वेलरी आणि जेमॉलॉजीचा कोर्स केला. ते म्हणतात, हा कोर्स केल्यामुळे माझी सगळी स्वप्ने साकार करण्यासाठीचा मला एक आत्मविश्वास मिळाला; आणि मी मनाशी पक्का निर्धार केला की, यामध्ये आपले एक स्वतःचे स्थान निर्माण करायचे.

मिटकॉनच्या कोर्सने त्यांना उद्योजकतेची प्रेरणा तर मिळाली; मात्र नक्की व्यवसायाला सुरुवात कशी करायची. त्यांनी घरातूनच याची सुरुवात केली. लोकांच्या मागणीनुसार ते दागिने बनवून देऊ लागले. हळूहळू या व्यवसायातली त्यांची पकड घट्ट होत गेली. त्यांनी बिबवेवाडीमध्ये अगोदर दुकान व ऑफिस टाकले. तेथेच त्यांनी रत्न पारखण्यासाठीची लॅब चालू केली. बिबवेवाडी येथील व्यवसायाचा जम बसल्यावर त्यांनी कोरेगाव पार्क येथील ज्वेल्स स्क्वेअर या प्रसिद्ध मॉल मध्ये  आउटलेट चालू केले, त्यामुळे त्यांच्याकडे परदेशी लोकही येऊ लागले. हॉलंड मधील ट्रॅन नावाच्या एका माणसाला त्यांनी हात पाहून ज्योतिषपर वैयक्तिक माहिती दिली तेंव्हा तो माणूस अवाक् झाला; कारण ती माहिती अगदी तंतोतंत खरी होती. त्या माणसाने नंतर हॉलंडवरून त्याच्या जवळच्या नातेवाईकांचे हाताचे ठसे विक्रांत यांच्याकडे पाठवले. विक्रांत सरफरे म्हणतात, माणसाच्या आयुष्यात योगायोग हा फक्त तीस टक्के आहे; बाकी सत्तर टक्के भविष्य माणसाच्या त्याच्या स्वतःच्या हातात आहे; मात्र जिद्द असेल तर हा तीस टक्के योगायोगही आपल्या अनुकूल करून घेणे हे माणसाच्याच हातात आहे; म्हणून ज्योतिष फलश्रुती ही मानवी इच्छेपुढे नाही. रत्ने ही मानवी आयुष्यात अनुकूल असतात; मात्र  योग्य रत्नांचाच वापर व्हायला हवा. ही अनुकुलता व माणसाचे श्रम हा योग जुळून आला तर काळ हा जास्तीत जास्त अनुकूल होतो; मात्र त्यासाठी श्रमही हवे, नुसती रत्ने घालून चालणार नाहीत. हात पाहून रत्ने सांगणे ही विक्रांत यांची विशेषता आहे. रत्नांबरोबरच ज्वेलरी मॅन्युफॅक्चरिंगही ते करतात. गिऱ्हाईकाच्या मागणीप्रमाणे दागिने बनवून देणे, ही त्यांची आणखी दुसरी विशेषता त्यांच्या माहितीनुसार सबंध पुण्यात असे कोणी

करत नाही. त्यांची तिसरी विशेषता म्हणजे सोरोस्की या आंतरराष्ट्रीय ब्रँडची रत्ने घेऊन स्वतःच्या डिझाईनमध्ये दागिने तयार करणे, हे कामही पुण्यात कोणी करत नाही.

विक्रांत यांचा सोने-चांदी-रत्ने याविषयीच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा अभ्यास आहे. या अभ्यासाच्या जोरावर ते भविष्यातील या बाजारात होणारे बदल सांगू शकतात. ते म्हणतात, २०१४ साली चांदीच्या एका किलोचा भाव पाच लाखापर्यंत जाण्याची शक्यता आहे; कारण जगातील औद्योगिक क्षेत्रातील चांदीच्या वापराच्या प्रमाणात वाढ होणार आहे. बॅटरी, ए.सी. संगणक याबरोबरच अनेक गोष्टींत चांदीच्या वापराचे प्रमाण वाढणार आहे. त्याचबरोबर चांदी हा धातू पुनर्वापरात (ठशलूलश्रश) येत नसल्यामुळे त्याला मर्यादा आहेत. सध्या चीन हा देश चांदीत जास्तीत जास्त गुंतवणूक करीत आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर चांदीमध्ये गुंतवणूक ही फायद्याचीच होणार आहे.

विक्रांत सरफरे यांनी बँकॉकमध्येही जेमॉलॉजी व ज्वेलरीचा ॲडव्हान्स कोर्स केला आहे. मिटकॉनमध्ये कोर्स केल्यानंतर तुम्हाला फायदा काय झाला, हे विचारल्यावर ते म्हणाले, मी माझे आयुष्य बदलू शकतो, हा आत्मविश्वास मला मिटकॉनने दिला.

vikrantsarfare@gmail.com